जा.क्र.तंशिविकापु/आस्था-३(अ)/संकिर्ण/परिपत्रक/२०१८/ 242

अतितात्काळ कालमर्यादित

दि. १९/०१/२०१८ पर्यंत

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे – ४११०१६.
दिनांक :-
17 JAN 2018

प्रति, :- संचालक/प्राचार्य,
सर्व शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,
सर्व शासकीय तंत्रनिकेतने, व तत्सम संस्था
यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

त्यांना कळविण्यात येते की, मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुबई यांचे पत्र क्र. १६/आस्था/संकिर्ण/२०१७/शा१९६१, दि. २२/०९/२०१७ चे अवलोकन करण्यात यावे. पत्रातील मुद्दा क्र. ०२,७,११ व १२ ची माहिती दि. १९/०१/२०१८ रोजी पर्यंत या कार्यालयास सादर करण्यात यावी. तसेच आपल्या संस्थेची/कार्यालयाची माहिती निरंक असल्यास तसे कळविण्यात यावे.

सोबत :-मा. संचालनालयाचे दि. २२/०९/२०१७ रोजीचे पत्र

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी – ३०२३३४७६, २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स - २२६९०००७.

E-mail : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१७/शा१९६१

दिनांक : 22 SEP 2017

प्रति,

१)सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

विषय : राज्य स्तरीय कर्णबधीर असोसिएशनच्या विविध मागण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१०/४/२०१७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत...

उपरोक्त विषयाबाबतचे शासनाचे पत्र क्रमांक अपंग-२०१७/प्र.क्र.८८-१७/आस्था-२, दिनांक २९.७.२०१७ सहपत्रांसह सोबत जोडत आहे.

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०.४.२०१७ रोजी राज्य स्तरीय कर्णबधीर असोसिएशनच्या विविध मागण्यांबाबत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत आहे. सदर इतिवृत्तातील मुद्दा क्रमांक २,७, ११ व १२, उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधीत आहे. बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास पाठवावा.

(सुचित्रा रणदिवे)
सहाय्यक संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :-

२) कार्यासन क्रमांक ४, ४अ व १२, मुख्य कार्यालय, मुंबई.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
26 SEP 2017
आवक क्र. 9457

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र.०२२-२२८२५७८१

क्र.अपंग-२०१७/प्र.क्र.८८-१७/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग.
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
४ था मजला, ४३१ (विस्तार),
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ जुलै, २०१७

प्रति,

सहसचिव (विद्यापीठशिक्षण), उपसचिव (महाविद्यालयीनशिक्षण /तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालये), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
संचालक (उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय), महाराष्ट्र राज्य.

विषय : राज्य स्तरीय कर्णबधीर असोसिएशनच्या विविध मागण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१०/०४/२०१७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१०.४.२०१७ रोजी राज्य स्तरीय कर्णबधीर असोसिएशनच्या विविध मागण्याबाबत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने सदर इतिवृत्तातील मुद्दा क्र.२,७,११ व १२ उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधीत आहे.बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आस्था-२ कार्यासनास सत्वर पाठविण्यात यावा, ही विनंती.

आपला,

सहपत्र : वरीलप्रमाणे.

(शा.भा.पारनाईक)
कक्ष अधिकारी , महाराष्ट्र शासन

D-16
Smt Rajdive madam
1/8/17

10/8/17

दिव्यांग शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे
दि. ९९६९
दिनांक 09/02/2016
९६

C:\Users\shivsh.padoya\Documents\क्र.अपं_८८_२०१७.docx

मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली, मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांच्या उपस्थितीत दि.१०.०४.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या मंत्रालयातील समिती कक्षात राज्यस्तरीय कर्णबधिर असोसिएशनच्या विविध मागण्यांबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

मा.मुख्यमंत्री यांच्याकडे खालील मुद्यांबाबत तपशिलवार चर्चा करण्यात आली. सदरचे मुद्दे व त्यावर मा.मुख्यमंत्री यांनी दिलेले निदेश पुढीलप्रमाणे आहेत. सदर बैठकीतील उपस्थितांची यादी सोबत जोडलेली आहे.

अ. क्र.	मागणी/मुद्दा	बैठकीत देण्यांत आलेले निर्देश	संबंधित विभाग
१.	महाराष्ट्र राज्य मुकबधिरांच्या उच्च शिक्षणासाठी शासकीय महाविद्यालय अथवा उच्च माध्यमिक विद्यालय उपलब्ध नाही. मुकबधिरांसाठी विभाग स्तरावर औरंगाबाद, अमरावती, नागपूर, पुणे, मुंबई व नाशिक येथे मध्यप्रदेश प्रमाणे इयत्ता १ ली ते १२ पर्यंत समाज कल्याण विभागाद्वारे शासकीय विद्यालय सुरू करावे. तसेच सदर विद्यालयामार्फत कला, वाणिज्य आणि विज्ञान इत्यादींचे ज्ञान देण्यात यावे. सदर विद्यालयामध्ये हिंदी, इंग्रजी व मराठी विषयाप्रमाणे सांकेतिक भाषेत शिक्षण दिले जावे. जेणेकरून केंद्र व राज्य सरकार यांच्या विविध उपक्रमामध्ये मुकबधिर सहभाग घेवू शकते.	१. मुकबधिरांसाठी इ.१ ली ते १२ वी साठी मुंबई, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर येथे शाळा सुरु आहेत. तथापि अजून शाळा वाढविण्यासाठी एक महिन्याच्या आत आराखडा तयार करुन सादर करण्यात यावा. २. सध्याचे शैक्षणिक धोरण सर्व समावेशीत शिक्षण असल्याने राज्यातील चांगल्या शैक्षणिक शाळांमध्ये मुकबधिर विदयार्थी जावेत. यासाठी चांगल्या दर्जाच्या नियमित शिक्षण देणा-या शाळा/ महाविदयालयांची निवड करण्यांत यावी व त्या ठिकाणी दुभाषक नेमण्याबाबत प्रयत्न केले जावेत. ३. अस्थिव्यंग प्रवर्गाच्या अनुदानीत शाळामधील कमी प्रमाणात अपंगत्व असलेले विदयार्थी सर्वसमावेशीत शाळेत जाऊ शकतात. त्यानुसार या शाळासाठी लागणारी तरतूद कमी करून सदर तरतूद अपंगांच्या कल्याणाच्या विविध योजनांसाठी करण्यात यावी ४. अपंगांच्या विशेष शाळांची शैक्षणिक गुणवत्ता तपासण्यासाठी व त्या अनुषंगाने गुणवत्ता वाढवण्यासाठी त्रयस्थ तज्ञ व्यक्तीची मदत घेऊन प्रयत्न केले जावेत.	शालेय शिक्षण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग/अ.क.१
२.	मुकबधिरांसाठी उच्च शिक्षण मंत्रालया मार्फत मुकबधिरांसाठी शासकीय महाविद्यालय सुरू करावे. ज्यामध्ये बी. ए, बी. कॉम, बी. एस. सी, इत्यादीचा समावेश व्हावा. तसेच त्यांच्यासाठी इंजिनिअरींग, नर्सिंग, फार्मसी, पॅरा	राज्यात बी. ए, बी. कॉम, बी. एस. सी, इंजिनिअरींग, नर्सिंग, फार्मसी, पॅरा मेडिकल कॉलेज यामधील काही निवडक संस्था निवडून तेथे तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सांकेतीक भाषेत शिक्षण देण्याचा प्रयत्न	उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैदयकीय शिक्षण विभाग.

महाराष्ट्र शासन

तात्काळ

क्रमांक :अपंग-२०१५ /प्र. क्र. ०९ /अ.क.२
सामाजिक न्याय, व विशेष सहाय्य विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १२.०७.२०१७.

अ.मु.स.
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र. 1170
दि. 14-7-17

प्रति,

अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव,

१) सामान्य प्रशासन विभाग
२) महसूल व वन विभाग,
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
५) वैद्यकीय शिक्षण व ओषधी द्रव्ये विभाग,
६) सार्वजनिक आरोग्य विभाग,
७) गृह विभाग (परिवहन),
८) ग्रामविकास विभाग,
९) कौशल्य विकास व उदयोजकता विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
१०) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे,
११) सह सचिव (अ. क. १), सा. न्या. व वि. स. विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

विषय:- राज्यस्तरीय कर्णबधिर असोसिएशनच्या विविध मागण्यांबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१०/०४/२०१७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१०.०४.२०१७ रोजी राज्यस्तरीय कर्णबधिर असोसिएशनच्या विविध मागण्यांबाबत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

२. तरी आपणांस विनंती आहे की, सदर इतिवृत्तातील मा. मंत्री (सा.न्या.) यांचे निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास विनाविलंब अवगत करण्यात यावे.

आपला,

सोबत:- वरीलप्रमाणे.

(कृ.त्रि. कदम)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत:- श्री.मनोज पटवारी, अध्यक्ष, राज्यस्तरीय कर्णबधिर असोसिएशन, औरंगाबाद, व्दारा-अनिकेत सेलगावंकर,"राधेय" वीर सावरकर चौक, विद्या नगर, परभणी.

प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव (मुलाखत कक्ष)
२)मा. मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव,
३) मा. राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव,
४)सचिव (सा.न्या.) यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक. ५) सह सचिव (अ.क.-२) यांचे स्वीय सहाय्यक

	मागणी/मुद्दा	बैठकीत देण्यांत आलेले निर्देश	संबंधित विभाग
	मेडिकल कॉलेजमध्ये मुकबधिरांच्या सांकेतिक भाषा तज्ञांची नियुक्ती करून मुकबधिरांना नियमानुसार प्रवेश देण्यात यावा. मुकबधिरांसाठी डी. एड, बी. एड चे स्वतंत्र महाविद्यालय अथवा त्यांच्यासाठी काही जागा समाज कल्याण विभागाद्वारे आरक्षित ठेवून त्यांच्या शिक्षणाचा खर्च समाज कल्याण विभागाद्वारे करण्यात यावा.	करावा. जेणे करुन मुकबधिर मुले संबंधित महाविदयालयात जाऊन शिक्षण घेतील.	
३.	मुकबधिरांना टेक्निकल ज्ञान देण्यासाठी व होतकरू मुकबधिरांसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय) महाविद्यालय सुरू करून जेणे करून त्यांना संगणकाचे ज्ञान, एमएचसीआयटी (MSCIT), टॅली (TALLY) फिटर, टर्नर, वेल्डर इत्यादि प्रशिक्षण प्राप्त होऊन ते केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागात टेक्नीशियन म्हणून काम करू शकतील.	मुकबधिरांना तांत्रिक ज्ञान मिळावे यासाठी विभागीय स्तरावरील एका औदयोगिक प्रशिक्षण संस्थेची निवड केली जावी व तिथे मुकबधिरांच्या शिक्षणासाठी दुभाषीची नेमणूक करणेबाबत प्रस्तावित करण्यांत यावे.	कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
४.	शिक्षण विभागामार्फत तसेच महाराष्ट्र शिक्षण परिषद समवेत १ ली ते १२ वी मुकबधिर विद्यार्थ्यांसाठी हिंदी, इंग्रजी, मराठी विषयाचे ज्ञान देण्यासाठी सांकेतिक भाषेचे पुस्तक उपलब्ध करून देण्यात यावे. आज देशात सांकेतिक भाषेचा डिग्री कोर्स सुरू झालेला आहे. ते कोर्स महाराष्ट्रात देखील सुरू करावे.	मुकबधिरांचे शिक्षण व्दिभाषीय पध्दतीने करण्यासाठी प्रयत्न केले जावेत. व त्यानुषंगाने माहिती व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पहिल्या चरणात इ.१ ली ते ४ थी च्या वर्गासाठी व्दिभाषीय सीडी तयार केल्या जाव्यात. यासाठी पहिली भाषा सांकेतीक भाषा राहील दुसरी भाषा मराठीचा अवलंब महाराष्ट्र शासनाच्या मंजूर बालभारतीच्या अभ्यासक्रमाप्रमाणेच करावा.	शालेय शिक्षण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग/अ.क.१
५.	राज्यात अपंगांच्या नावांवर खोटे वैद्यकिय अपंग प्रमाणपत्र बनवून अपंगांच्या सवलती लाटल्या जात आहेत. शासकीय रूग्णालयातही डॉक्टरही कोणतीही खातरजमा न करता आर्थिक अमिषापोटी खोटे अपंगांचे प्रमाणपत्रे सर्रासपणे देत आहेत. परिणामी खऱ्या अपंगांवर अन्याय होत आहे. शासकीय कार्यालयामध्ये कर्ण व मुकबधिर अपंगांसाठी राखीव जागा आहेत. मात्र या जागा जवळपास खोटया लाभ धारकांनाच मिळाल्या असल्यामुळे खरे	१. कर्णबधिरांच्या खोटया प्रमाणपत्रांना आळा घालण्यासाठी तपासणीसाठी सक्षम यत्रणेमार्फत प्रादेशिक स्तरावर कॅम्प आयोजीत करण्यांत यावेत. या कॅम्पच्या माध्यमातुन कर्णबधिरांसाठी आरक्षीत असलेल्या कोटयातून शासकीय नोकरी मिळालेल्या कर्मचा-यांची वैदयकीय तपासणी BERA तपासणीद्वारे करण्यांत यावी. सदरची तपासणी करतांना राज्यस्तरीय कर्णबधिर असोसिएशन, परभणी यांचे दोन प्रतिनिधी तपासणीच्या वेळी उपस्थित राहतील. यामध्ये खोटे प्रमाणपत्र आढळलेल्या प्रकरणी संबंधितां	सार्वजनिक आरोग्य विभाग, वैदयकीय शिक्षण विभाग

अ. क्र.	मागणी/मुद्दा	बैठकीत देण्यांत आलेले निर्देश	स.
	अपंग त्यापासून वंचित राहिले आहेत. सध्या मुकबधिरांसाठी अपंगांचे प्रमाणपत्र देण्याकरिता सोपी ऑडिओमॅट्री वैद्यकिय तपासणी घेतली जातात व त्यांना अपंग असल्याचे प्रमाणपत्र दिले जाते. या वैद्यकिय तपासणीमध्ये बधिरांच्या कानात एक ध्वनी सोडली जाते व त्याला विचारले जाते, काही ऐकू येते की नाही ? ज्याला खोटे प्रमाणपत्र हवे असेल, तो सांगतो की, काहीच ऐकू येत नाही. जेणेकरून बीआरअे तपासणी (Brain Stem evoked response audiometry Test) घेतली जावी व त्यानंतरच अपंगाचे प्रमाणपत्र दिले जावे. तसेच मागील १५ वर्षापासून जे कर्ण व मुकबधिर कोटयातून शासकीय नोकर भरती केले गेले, त्यांची देखील पुन्हा वैद्यकिय तपासणी करावी. व खोटया अपंग प्रमाणपत्र धारण करणाऱ्यावर केंद्रीय अपंग व्यक्ती (समान संधी) संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण अधिनियम १९९५ नुसार कलम ६९ प्रमाणे कार्यवाही सुध्दा करण्यात यावी.	विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कारवाई प्रस्तावित करण्यांत यावी. २. अपंग प्रमाणपत्रांची वाढती मागणी लक्षात घेता महानगरपालिकांची रुग्णालये, केंद्र शासनाची रुग्णालये व संस्था जसे अलियावर जंग श्रवण विकलांग संस्था, मुंबई, अखिल भारतीय भौतिकोपचार एवंम पुनर्वसन संस्था, हजिअली, मुंबई, एएफएमसी, पुणे या संस्थांना अपंग प्रमाणपत्रे देण्याबाबत प्राधिकृत करण्यांत यावे जेणे करुन अपंगत्वाची प्रमाणपत्रे लोकांना त्वरीत मिळतील. तसेच दिव्यागाकरिता राखून ठेवण्यात आलेल्या ३% निधीचा उपयोग करून शिबीरे आयोजित करण्यात यावी व अपंगत्व प्रमाणपत्राबाबतचा अनुशेष दुर करावा. ३. राज्यातील Audiologist ची कमतरता पाहता राज्यांत यांची वाढ करण्यासाठी विहीत मान्यतेने कार्यवाही करावी. ४. BERA तपासणी करूनच कर्णबधिरांना अपंगत्व प्रमाणपत्र देण्यात यावे. तसेच BERA तपासणी जिल्हास्तरावरील रूग्णालयात करण्यासाठी प्रयत्न केले जावेत.	
६.	अपंग व्यक्ती (समान संधी) संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण अधिनियम १९९५ नुसार कलम ३२ अन्वये मुकबधिरांसाठी असलेले पदे ओळखून त्यांच्यासाठी आरक्षीत ठेवण्यांत येऊन व त्यामध्ये अपंग मुकबधिरांची भरती करण्यांत यावी. सदर अधिनियमामध्ये याचा आढावा प्रत्येक तीन वर्षामध्ये घेणे बंधनकारक आहे. परंतु सन २०११ नंतर कोणताही आढावा आतापर्यंत घेतलेला नाही. जेणेकरुन आता यापुढे मुकबधिरांना आढावा समितीमध्ये नियमा नुसार सामावून घ्यावे.	शासकीय सेवेतील पदे अपंगांसाठी सुनिश्चित करण्यासाठीच्या तज्ञ समितीमध्ये समितीमध्ये कर्णबधिरांचे प्रतिनिधी घेण्यात यावेत.	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग/अ.क.२
७.	शिक्षण विभागामार्फत शिक्षक वर्ग पहिला ते तिसरीसाठी मुकबधिर शिक्षकांसाठी १% आरक्षणाचा लाभ त्यांना प्राप्त होत नाही. ही बाब घटनाबाहय आहे. इंदौर खंडपीठाने	१. राज्यातील अनुदानीत शाळा/ महाविद्यालयामध्ये अपंगांसाठीच्या कायद्यातील तरतूदीनुसार विहीत केलेल्या आरक्षणाप्रमाणे १ % कर्णबधीर भरतीबाबत आढावा घेण्यात यावा व	शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, उच्च् व तंत्र शिक्षण विभाग, सामाजिक न्याय

अ.	मागणी/मुद्दा	बैठकीत देण्यांत आलेले निर्देश	संबंधित विभाग
	याचिका क्रमांक ८५४८/२०११ रिट पिटीशन क्र. ७३५, ७३६, ७३७/२०१२ आणि १३/२०१३ प्रमाणे मुकबधिरांसाठी आरक्षणाची तरतूद करण्यसाठी खंडपीठाने मध्यप्रदेश शासनाला आदेशीत केलेले आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात सुध्दा मुकबधिरांसाठी सदर जागा आरक्षित करण्यात यावी. मुकबधिरांसाठी त्यांना डी. एड आणि बी. एड ची अट शिथील करण्यात यावी. तसेच त्यांना जर शिक्षण विभागामध्ये समाविष्ट करण्यात आले तर त्यांना शासनाच्या खर्चाने सुविधा पुरवून त्यांचे डि. एड बी. एड चे शिक्षण पूर्ण करून घेण्यात यावे. महाराष्ट्रामध्ये १९६६७ बधिर विद्यार्थी सामान्य शाळेमध्ये प्रवेश घेतलेला आहे. त्यासाठी सामान्य शाळेमध्ये देखील मुकबधिर शिक्षकांची नियुक्ती करण्यांत यावी. तसेच कायद्याप्रमाणे त्याचेसाठी आरक्षित १%जागेसाठी मोबाईल शिक्षक म्हणून मुकबधिरांची नियुक्ती करण्यांत यावी.शासकीय नियुक्ती करतांना पुर्णत: मुकबधिरांना नियुक्ती देण्यात यावी. व त्यांची भरती केल्यानंतरच अशा अर्धवट अपंगांना भरती करण्यात यावे.	त्यानुसार आवश्यक त्या सुचना निर्गमित कराव्यात. २. अपंगांचा १% कोटा पूर्ण होण्याच्या दृष्टीने काही निवडक पदे ज्यामध्ये कर्णबधिर प्रवर्गातील व्यक्ती काम करु शकतील अशा ठिकाणी त्यांना जास्तीचे आरक्षण देऊन १% आरक्षणाचा कोटा सर्व विभागानी भरण्यासाठी प्रयत्न केले जावेत. मात्र प्रत्येक संवर्गासाठी कोण कोणती कामे करणे अपेक्षीत आहे, हे लक्षात घेऊनच कर्णबधिरांसाठी असलेले आरक्षण कसे ठेवावे याबाबत निर्णय घेण्यांत यावा. ३. अपंगांच्या विशेष शाळांमध्ये ज्या ठिकाणी कर्णबधिर मुले काम करु शकतात अशा वर्ग-३, वर्ग-४ पदावर कर्णबधिरांच्या शाळेत शाळा संहिता १९९७ प्रमाणे ५०% शिक्षक हे अपंग घेतले जावे ज्यात मुकबधिरांचा समावेश असेल. अशा पध्दतीने कार्य केल्यास पूर्ण राज्याचा विचार करता शिक्षण क्षेत्रात १% कर्णबधिर भरती सुयोग्य पध्दतीने राबविली जावी.	व विशेष सहाय्य विभाग/अ.क.१.
८.	मुकबधिरांना अपंग व्यक्ती (समान संधी) संपूर्ण सहभाग व हक्कांचे सरंक्षण अधिनियम १९९५ नुसार कलम ६८ प्रमाणे जर त्यांची नियुक्ती २ वर्षाच्या आत करण्यांत आली नाही, तर त्यांना बरोजगार भत्ता सुध्दा देण्याची व्यवस्था समाज कल्याण अधिकारी यांचेमार्फत प्रत्येक जिल्हास्तरावर करण्यांत यावी.	सदर तरतूदीप्रमाणे बेरोजगार भत्त्याबाबत केद्र शासनाने काय कार्यवाही केली आहे, याबाबत तपासणी करावी. तसेच बेरोजगार भत्त्या ऐवजी प्रशिक्षण, नोकरी व कौशल्य विकास यावर जास्त भर देण्यांत यावा.	कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
९.	महाराष्ट्रात मुकबधिरांसाठी उच्च शिक्षणाची सोय नसल्याने शासकीय नोकरीमध्ये त्यांना घेण्यासाठी उच्च शिक्षणाची अट लादू नये. लेखी परिक्षा न घेता विनाअट मुकबधिरांना शासकीय नोकरीत सामावून घ्यावे.	कर्णबधिरांना उच्च् शिक्षणाची सोय नसल्या कारणाने उच्च शिक्षणाची अट शिथील करुन मुकबधिरांच्या नोकरीसाठी काय करता येईल याबाबत त्या त्या वर्गांचा विचार करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल. तसेच सघटनेने सुचना केल्यानुसार	सर्व संबंधित विभागाचे नियोक्ता प्राधिकारी, सामान्य प्रशासन विभाग

अ. क्र.	मागणी/मुद्दा	बैठकीत देण्यांत आलेले निर्देश	संबं.
		मध्यप्रदेश राज्याप्रमाणे कर्णबधिरांना वर्ग ३ व ४ च्या पदावर विनालेखी परीक्षा भरती करण्याची बाब तपासावी.	
१०.	केरळ सरकारच्या धरतीवर महाराष्ट्रातही सर्व मुक-कर्णबधिरांना वाहन चालविण्याचा परवाना त्यांच्या कुटूंबियांना उदरनिर्वाह व इलाजासाठी व इतर कामासाठी त्यांना वाहन चालविण्याचा परवाना देण्यात यावा.	दिनांक ३१.३.२०१७ रोजी आयुक्त, परिवहन यांनी काढलेल्या परिपत्रका प्रमाणे कर्णबधिरांची ही मागणी पूर्ण झालेली आहे.	गृह विभाग (परिवहन)
११.	अपंगांच्या हिताशी संबंधीत निर्गमीत करण्यांत येणारे शासन निर्णय/ परिपत्रक/जाहिरातीच्या प्रती आमच्या संस्थांनाही पाठविण्यांत याव्यात.	शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.	शासनाचे सर्व विभाग
१२	८० ते १०० टक्के मुक व कर्णबधिर अपंग उमेदवारांना प्रथम प्राधान्याने शासकीय नोकरीत सामावून घ्यावेत.	कर्णबधिरांना नोकरीसाठी योग्य त्या पदावर पात्रतेनुसार घेण्यांत यावे.	शासनाचे सर्व विभाग
१३	मुक व कर्णबधिर अपंगंना सरकारी जागेवर उदा. बसस्थानक, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद व खाजगी रूग्णालयात रसाच्या (ज्युस) व्यवसाय करण्याची जागा उपलब्ध करून द्यावे.	रसाच्या (ज्युस) व्यवसायासाठी जागा मिळणेबाबत अस्तित्वात असलेल्या धोरणाची अंमलबजावणी संबंधित विभागांनी करावी.	१.महसूल विभाग २.नगर विकास विभाग, ३.ग्राम विकास विभाग, ४.कामगार व उदयोग उर्जा विभाग, ५. गृह विभाग (परिवहन), ६.सार्वजनिक आरोग्य विभाग
१४	बांद्रा (मुंबई) येथील अलियावर जंग श्रवण विकलांग संस्थांच्या संचालकांची बदली करून व सीबीआय मार्फत चौकशी करावी.	जर संचालक, अलियावर जंग श्रवण विकलांग संस्था, मुंबई यांच्या विरुध्द विस्तृत लेखी तक्रार प्राप्त झाली असल्यास ती केंद्र शासनाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यांत यावी.	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग/अ.क.२.

उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त करण्यात आली.

----------xox----------

मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली, मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांच्या उपस्थितीत दि.१०.०४.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या मंत्रालयातील समिती कक्षात राज्यस्तरीय कर्णबधिर असोसिएशनच्या विविध मागण्यांबाबत झालेल्या बैठकीसाठी उपस्थित अधिकारी / संबधितांची यादी-

अ.क्र.	अधिकारी/संबधितांचे नाव	विभाग
१	श्री.सितराम कुंटे, अ.मु.स.	उच्च व तंत्र शिक्षण विभाग
२	श्री.राजगोपाल देवरा, प्रधान सचिव	वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
३	श्री.मनोज सौनिक, प्रधान सचिव	गृह विभाग (परिवहन)
४	श्री.असीम गुप्ता, सचिव	ग्राम विकास विभाग
५	डॉ.सुरेन्द्रकुमार बागडे, सचिव	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
६	श्री.नितीन पाटील, आयुक्त	अपंग कल्याण आयुक्तालय,पुणे
७	श्री.ता.मा.कोळेकर, सहसचिव	सार्वजनिक आरोग्य विभाग
८	श्री.दि.रा.डिंगळे, सहसचिव	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
९	श्री.योगेश पाटील, उपसंचालक	कौशल्य विकास संचालनालय,मुंबई
१०	श्री.कि.पां.वडते, उपसचिव	महसुल व वन विभाग
११	श्री.टि.वा.करपते, उपसचिव	सामान्य प्रशासन विभाग
१२	श्री.एस.डी.खरात, उपसचिव	कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
१३	श्री.एस.जी.पाटील, उपसचिव	कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
१४	श्री.ग्यानेंद्र पुरोहित, वकील	--
१५	श्री.मनोज पटवारी, अध्यक्ष	राज्यस्तरीय कर्णबधीर असोसिएशन
१६	श्री.अनिकेत सेलगावकर, सचिव	राज्यस्तरीय कर्णबधीर असोसिएशन
१७	इतर प्रतिनिधी	राज्यस्तरीय कर्णबधीर असोसिएशन